# जागरुक मतदार लोकशाहीचा आधार-प्रा.डॉ.संजय देवडे

देगलूर - कै. बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगांव येथील राष्ट्रीय सेवा विभागाचे विशेष शिबिर मौजे तुंबरपली येथे चालू असून आज (दिं. २०) तिसऱ्या दिवशीच्या द्वितीय सत्रात देगलूर महाविद्यालय देगलूरचे प्रा. डॉ. संजय देवडे यांनी नवमतदार नोंदणी व मतदान जनजागृती या विषयावर बोलताना वरील उदगार काढले. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून लोकशाहीची परिपक्वता ही जागरूक मतदारांवर अवलंबून असल्याचे मत या प्रसंगी



त्यांनी व्यक्त केले. भारतीय मतदारामधील तरूण मतदारांचे प्रमाण लक्षणीय असल्याने लोकशाही संवर्धन आणि तिचे मूल्ये जोपासण्याची सर्वाधिक जबाबदारी ही तरूण मतदारांवर असल्याचे मत या कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख वक्ते डॉ. आनंद शिंदे यांनी व्यक्त केले. नवमतदार नोंदणीसाठी तुंबरपळी शाळेचे शिक्षक व बीएलओ श्री एडलावार यांनी नवमतदार नोंदणीची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली आणि मतदार नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांना वितरीत केले. या बौद्धिक सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा कार्यक्रमाधिकारी डॉ. उमाकांत बिरादार हे होते तर प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाधिकारी डॉ. पवन एमेकर यांची होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थीनीं कु. संजिवनी पाटील तर आभारप्रदर्शन कु. वैष्णवी गवळी हीने केले. या कार्यक्रमासाठी प्रा. सौ. सुनिता कांबळे, प्रा. डॉ. राजेंद्र साधने यांच्यासह रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner